# प्रकरण ६

# उपसंहार.

पृ. १३५ ते १४२

# प्रकरण ६
# उपसंहार

मुस्लिमांच्या दलितसदृश व्यथा-वेदनांचे चित्रण डॉ. यू.म. पठाण यांच्या 'जितराब' आणि 'हवेली' या कथासंग्रहाच्या आधारे या प्रबंधाची मांडणी केलेली आहे. सर्व प्रकरणांचा अभ्यास झाल्यानंतर साहजिकच त्यामध्ये आपण काय लिहले, कोणता दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून लिहले आणि तो अभ्यास पुरा केल्यानंतर त्यातून निष्कर्ष काय निघाला हे पहावे लागेल.

**पहिले प्रकरण** – पहिल्या प्रकरणात प्रास्ताविकता दलित म्हणजे काय ते सांगितले आहे. या देशातील अर्थव्यवस्थेने आणि समाजव्यवस्थेने ज्यांना माणूसपण नाकारले आणि ज्यांच्या वाट्याला फक्त शोषणची दु:खे आली त्या सर्वांना 'दलित' हे पद योजून संबोधलेले दिसते. तसेच पूर्वाभ्यासाचे स्वरूप मांडत असताना दलित साहित्य : प्रश्न आणि आव्हान, राजकीय सत्ता, अर्थसत्ता, धर्मसत्ता ही शोषणाची हत्यारे ज्या सवर्णांच्या जवळ आहेत त्यांनी वर्षानुवर्षे दलित जाती जमातींना अज्ञानांधारात तर ठेवलेच पण त्यांना दारिद्रय अन्याय छळ इ. सोसण्याशिवाय दुसरा पर्याय ठेवला नाही. उच्च शिक्षण घेणाऱ्या या गरीब मुलांची स्वप्ने उध्वस्त का होतात त्याचा शोध घेतला त्याची कारणे फुले, आंबेडकर, न्या. रानडे, गांधीजी इ. अनेक विचारवंतांनी शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी हत्यार होवू शकेल असे मत मांडले. एकात्मता कशी येणार? दलित-आदिवासी-ग्रामीण १९८७ साली झालेल्या साहित्य संमेलनातील डॉ. आनंद यादव व डॉ. रावसाहेब याचे मत तसेच दलित साहित्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान, मुस्लिम कथावर म. गांधी, डॉ. आंबेडकर व मार्क्सवाद यांचा झालेला परिणाम तसेच दलित साहित्यावर म. गांधी, डॉ. आंबेडकर व मार्क्सवाद यांचा झालेला परिणाम गांधीवादाने दलितांकडे पाहण्याची भूतदयावादी दृष्टी दिली. आंबेडकरवादाने दलितांना ताठ मानेने उभे राहण्याचे बळ दिले तर मार्क्सवादाने श्रमिकांना जगण्याची जाणीव दिली याचा

श्री.म. माटे, गंगाधर गाडगीळ, बंधूमाधव, शंकरराव खरात, बाबूराव बागूल, केशव मेश्राम, होवाळ या लेखांच्यावर त्यांच्या कथांवर झालेला परिणाम मुस्लिम कथांवर झालेला परिणाम, मुस्लिम दलित कथा कशा प्रकारच्या आहेत या सर्व घटकाचा आढावा घेऊन तो पहिल्या प्रकरणात मांडण्यात आलेला आहे.

**प्रकरण दुसरे :-** दुसऱ्या प्रकरणात डॉ. यू.म. पठाण यांच्या साहित्यिक योगदान आणि कथालेखनाच्या प्रेरणा आणि स्वरूपांचा आलेख अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. पठाण यांच्या व्यक्तीमत्वाला पूरक असे वातावरण सुरूवातीला त्यांच्या घरापासून, त्यांच्या सहवासातील माणसापासून त्यांची सद्‌भावना तर आदर्श होतीच पण संस्कृतीही उच्च होती त्यामुळेच उच्च विचार, वाचन, मनन, चिंतन, लेखन याची सवय डॉ. पठाण यांना लागली. त्याबरोबर साहित्य वाचनाची अविट गोडीही त्यांच्या वडिलांनी त्यांना लावली. डॉ. यू.म.पठाण आपल्या जीवननिष्ठेबद्दल म्हणतात - अखंड ज्ञानार्जन आणि ज्ञानप्रसार हीच माझ्या जीवनाची निष्ठा आहे तीच माझ्या जीवनाची प्रेरणा आहे. ती जीवनातून नाहीशी झाली तर जगण्यात काही स्वारस्यच उरणार नाही पण असं होईलच कस? ज्ञान हे तर अनादी आहे आणि ते अनंतही आहे. आपल्या जीवनाला मात्र आदी आणि अंत आहे. आद्यन्तयुक्त अशा आपल्या जीवनात हे अनादी अनंत ज्ञान दोन्ही करांत जितकं सामावतं तितकं घ्यावं आणि याच दोन्ही करांनी ते जितकं देता येईल तितकं आयुष्यभर देत रहावं म्हणूनच त्यांनी प्राध्यापकाची नोकरी स्विकारली कारण ज्ञानार्जन-ज्ञानप्रसार-अध्ययन-अध्यापन ही कार्य याच नोकरीमुळे करता येऊ शकते. यातूनच त्यांच्या व्यक्तीमत्वाला विविधअंगी स्वरूप प्राप्त झाले आणि मराठवाड्यातील माणसे आणि तेथील संशोधनात ते रमून गेले. संशोधनाच्या नवनवीन वाटा ते धुंडाळत गेले व त्यातून अनेक साहित्यकृती निर्माण होत गेल्या. त्यासाठी योग्य मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्ती त्यांना मिळत गेल्या याचा अनन्य संबंध त्यांच्या व्यक्तीमत्वाच्या घडणीसाठी कसकसा घडत गेला याचे त्यांच्या साहित्यातून प्रतिबिंब उमटलेले दिसून येते. सूक्ष्म निरीक्षणशक्ती याचा त्यांच्या

व्यक्तीमत्वातील आविष्कार त्यांच्या साहित्यात दिसून येतो. त्यांना ज्या ज्या व्यक्ती भेटल्या त्यांच्या सहवासातील घटना प्रसंग यांचे शब्दबध्द शैलीतून त्यांच्या साहित्यात त्या व्यक्ती उतरलेल्या दिसून येतात. त्या व्यक्ती डॉ. पठाण यांच्या साहित्यात जास्त प्रेरणादायी ठरल्यामुळे त्याचे साहित्यलेखन घडत गेले. डॉ. पठाण यांनी केवळ मराठीतून आपले साहित्य न लिहिता हिंदी, इंग्लिशमधूनही ते लिहिले. संशोधनपर पुस्तके, कथासंग्रह, ललितलेखसंग्रह, व्यक्तीचित्र संग्रह, स्तंभलेखन अशा साहित्य वाङ्मयाच्या विविध क्षेत्रात त्यांनी आपले कौशल्य आत्मसात केलेले दिसून येते. त्यांच्या साहित्यात सामान्य व्यक्तींपासून उच्चकोटीची व्यक्तीरेखा साकारलेली तसेच त्यांच्या आंतरमनाची स्पंदने व्यक्त झालेली दिसून येतात. त्यांच्या कथालेखनात या गोष्टीचा प्रत्यय तर होतोच पण आठव-ज्ञानदेवाचा-ज्ञानदेवीचा यातूनही त्यांचा प्रत्यय येतो. डॉ. पठाण यांच्या साहित्याचा मागोवा येथे घेतला आहे. प्रकरणाच्या शेवटी नऊ निष्कर्ष देऊन डॉ. पठाण यांचे साहित्यिक योगदान आणि प्रेरणा व स्वरूप यथार्थ परामर्श या प्रकरणात घेतला आहे.

**प्रकरण तिसरे :-** डॉ. यू.म. पठाण यांच्या 'जितराब' कथासंग्रहातील मुस्लिमांच्या दलितसदृश्य जीवनातील व्यथा वेदनांचे चित्रण यामध्ये 'जितराब' या कथासंग्रहातील जितराब, मुद्रा, आधार, दोजख, बदनसीब, आळ, कॉस्मिक, करवत, रणरणत ऊन, चक्र, पानगळ, गुप्तधन, फितरा, विस्मृती इ. कथांचा प्रथम समग्र आशय मांडून या कथासंग्रहातील आशयदृष्टया समृध्द असलेले विशेष मांडले आहे. डॉ. पठाण यांच्या कथेत मुस्लिम दलित कुटुंबं तिथली व्यवस्था त्यातला माणूस, तिथल्या अडी-अडचणी, त्या सोडवण्यासाठी व त्यांना सामोरे जाण्यासाठी माणसाची चाललेली धडपड याचे वर्णन करून त्याचे चित्रण केले आहे. या संग्रहात मुस्लिम दलितसदृश्य माणसाची शोषितांची दु:ख लेखकाने या संग्रहात अभिव्यक्त केली आहेत. औरंगाबाद परिसरात माणसाचे सुख, दु:ख त्याला साजेशा भाषाशैलीतून ते मांडतात. या दृष्टीने त्यांच्या 'जितराब', 'आधार', 'दोजख', 'करवत', 'चक्र' इ. कथा वाचण्यासारख्या आहेत. या

दु:खाच्या असहाय्य वेदनेची नस त्यांच्या कथेचा धागा आहे. ही वेदना निर्माण होते ती दारिद्रयातून. कौटुंबिक सुख-दु:खाचे तिथल्या ताण-तणावाचे संघर्षमय जीवन चित्रीत झाल्याचे अनेक उदाहरणातून दाखविले आहे. शिवाय अभिव्यक्तीच्या अंगाने हा कथासंग्रह मुस्लिम दलित सदृश् व्यथा-वेदना या दृष्टीने हा कथासंग्रह वाचनीय झाला आहे. मुस्लिम दलित सदृश कथामध्ये परंपरेने चालत आलेला व्यवसाय व्यक्तीच्या कथा, 'आधार', 'चक्र', 'करवत' या कथातून ते आढळते. डॉ. पठाण यांनी केवळ मुस्लिमच नाहीत तर विविध रंगांनी त्यांचा कथा संग्रह रंगला आहे. मानवी प्रवृत्तीचे अनेक कंगोरे टिपण्याचे कौशल्य त्यांच्या या कथासंग्रहात दिसून येते. हकीकतीत घटना प्रसंगाचा क्रम त्या घटना जशा घडत गेल्या त्या क्रमाने येतो. कथानकात ही क्रमबध्दता लेखक पाळतोच असे नाही. डॉ. पठाण यांच्या कथांचे रूप अशा स्वरूपाचे आहे. त्यांच्या कथा भूतकाळात रममाण होतात व त्यानंतर तिला वास्तवाचे रूप येते. लेखकाने विशिष्ट स्वभावधर्माची पात्रे निर्माण केलेली असतात. कथांतर्गत त्यांनी जवळ जवळ सर्व कथातून घडून गेलेल्या घटना व त्या घटनांचा आजच्या व्यक्तीला भोगावा लागणारा परिणाम यांची मांडणी केली आहे. डॉ. पठाण यांच्या कथेतील कथानक व्यक्ती व गत जीवनाकडे पाहून होणासी अगतिकता ते कथनरूपात गुंफतात. कथेत लेखकांनी मुस्लिम दलित सदृश कुटुंबाचे, स्त्री-पुरुषाच्या व्यथा-वेदना, घटनाक्रमानुसार चित्रीत केल्या आहेत. ही पात्रे चल स्वरूपाची आहेत. त्यांच्या कथेतील स्त्री-पुरुष आपली संस्कारमूल्य जपतात. व्यक्तीमनाचे अनेक कंगोरे त्यांची कथा व्यक्त करते. व्यक्ती जीवनाचा अन्वय लावणे हा त्यांचा विशेष होय हे उदाहरणासह येथे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. विशिष्ट स्वभावधर्माची पात्रे त्यांच्या कथेत दिसतात. या संग्रहात माणूस हा केंद्रबिंदू मानून त्याच्या स्वभावधर्माची अनेक रूपे हे या कथासंग्रहाचे विशेष दिसून येते. या संग्रहातील निवेदनाची पृथकता, संवाद शैलीचे स्वरुप, भाषाशैलीचा डौल कसा प्रतिबिंबीत झाला आहे याचे अनेक संदर्भ देवून स्पष्ट करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. माणसाची जगण्याची धडपड, त्यातून करावे

लागणारे प्रयत्न त्यामुळे दु:ख, दारिद्रय, उपासमार याला सामोरे जाताना होणारी ओढाताण या सर्व प्रवृत्ती लेखकाने स्पष्ट करताना मुस्लिम दलित जीवनाची जी धाटणी अवलंबली आहे त्याचे अनेक उदाहरणांच्या द्वारे आणि समृध्द संदर्भाच्या आधारे स्पष्ट करून डॉ. पठाणांच्या कथासंग्रहाची विवरणात्मक आणि समीक्षणात्मक दखल येथे घडविली आहे.

**प्रकरण चौथे :-** प्रकरण चारमध्ये 'हवेली' कथासंग्रहातील मुस्लिम जीवनाच्या अस्वस्थ करणाऱ्या अंगांचे प्रतिबिंब कसे उमटले आहे हे पडताळण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथम 'हवेली' या कथासंग्रहातील अलविदा, हेवा, पूर, काठ, हवेली, पार्टी, पाश, वाताहत, साया, घुसमट, यतीम, पहाट, डोह, पातक, आफत, अगतिक, भोग, इगो, भाता, हळहळ, मैत्रीणी, खुदा हाफीज, पंप, दावत इ. कथांच्या मांडणीचे स्वरूप स्पष्ट करून आशय अभिव्यक्त केला आहे. नंतर आशयाची समृध्दता आणि विशेष म्हणून विषयाचे वैविध्य हे जाणीवपूर्वक हाताळले आहे. कौटुंबिक चित्रणातील ताण-तणावाचे चित्रण हवेली, डोह, अगतिक, भाता इ. कथातून आले आहे. हे अनेक उदाहरणातून दाखवून दिले आहे. त्यातच कुटुंब व्यवस्थांचे दर्शन घडविले आहे. त्याचबरोबर दु:ख, दारिद्रयाचे चित्रण कसे आले आहे हे अनेक कथांच्या माध्यमातून विवेचले आहे. संघर्षमय जीवनाचा पटच जणू डॉ. पठाण यांनी या संग्रहात मांडला आहे. हे उदाहरणासह दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. जीवन म्हणजे झुंज आहे आणि ते झुंजत झुंजतच जगले पाहिजे अशी वृत्ती मानून 'हवेली' या कथासंग्रहातील बहुतेक करून स्त्री पुरुष जीवन जगताना आढळतात. जीवन संघर्ष हा डॉ. पठाणांच्या कथेचा पिंड आहे. जगताना व्यक्तीला करावा लागणारा जीवघेणा संघर्ष हा मोठा विदारक आहे. व्यसनाधीन पतीबरोबर संसार करताना रूकसानाला अनेक संकटांना तोंड देत मार्गक्रम करावा लागतो. जीवनात स्त्रियांना पतीशिवाय जगताना कोण कोणत्या संघर्षाला तोंड दयावे लागते याचे चित्रण पाश, भोग, भाता या कथेत दिसून येते. या कथासंग्रहातील सर्वच कथा एकत्रित वाचल्या तर आशयदृष्टया त्या समृध्द वाटतात. मुस्लिम दलित सदृश जीवनाचं वास्तव

हृदयस्पर्शी कारूण्य दु:ख यांच चित्रण करणाऱ्या कथा यात जणू एकवटल्या आहेत. केवळ मुस्लिमच नव्हे तर इतर कथाही यामध्ये आहेत. साध्या विषयातून मोठा आशय संपन्न करण्याचे सामर्थ्य लेखक डॉ. पठाण यांच्या लेखनशैलीत आहे. प्रस्थापितांचे आशय वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे सामर्थ्यही त्यांना लाभलेले आहे. त्यांच्या कथेचे कथानक, वातावरण निर्मिती, व्यक्तीचित्रण, निवेदनशैली, भाषाशैली याने परिपूर्ण झालेले आहे. ते अनेक संदर्भासह पटवून देण्याचा प्रयत्न या प्रकरणात केलेला आहे. कथानक ही व्यापक कल्पना असून कथात्मकता हा कथानकाचा प्राण आहे. लेखकाच्या जीवनविषयक कलात्मक दृष्टीकोनावर कथात्मकतेचे स्वरूप नक्की होते. व्यक्ती, घटना, प्रसंग व निवेदन या सर्व घटकांनी मिळून कथानक तयार होते.

याचा प्रत्यय त्यांच्या या कथासंग्रहात दिसतो. तो मांडण्याचा प्रयत्न येथे केला आहे. डॉ. यू.म. पठाण यांची कथा ही व्यक्तीप्रधान स्वरूपाची कथा आहे. कौटुंबिक व्यक्तीचे जीवन अनेक आघाताने उन्मळून जाते. रोजच्या जीवनातील कटकटी, प्रचंड दारिद्रय यासाठी धडपड इ. अंगाने डॉ. पठाण यांची कथा आकाराला येते. व्यक्तीचित्रणाच्या बाबतीत डॉ. पठाण यांची कथाजीवनातील माणसाच्या विविध वृत्ती प्रवृत्ती चित्रीत करणं हा त्यांच्या कथेचा खास पिंड आहे. त्या व्यक्ती उभ्या करण्याचं सामर्थ्य त्यांच्या लेखनशैलीत आहे. स्थळकाळान्वये व्यक्ती या बदलत असतात. आपल्या मनाला समजूत घालतात, परिस्थितीशी जुळवून घेतात. मुस्लिम जीवनातील स्त्री–पुरूषांच्या भाव जीवनाचे अनेक कंगोरे लेखक डॉ. पठाण यांनी या संग्रहात टिपले आहेत त्याचा परामर्श येथे घेतला आहे. वातावरण निर्मिती करताना लेखकाने जी शैली वापरली आहे ती पाहण्यासारखी आहे. व्यक्ती आणि घटना प्रसंग एखादया स्थळकालाच्या चौकटीतच घडत असतात त्या व्यक्ती कौटुंबिक पातळीवरच बहुधा वावरत आहे. त्यामुळे त्यांच्या कथेला कौटुंबिक वातावरणाची पार्श्वभूमी आहे. निवेदन शैलीचे रूप स्पष्ट करताना संवादमय शैली हा डॉ. पठाण यांच्या कथालेखनाचा पिंड कसा हे त्यांच्या या संग्रहात साकार केले आहे हे येथे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

मनोवर्णनातून मनोविश्लेषण करताना त्यांनी अभिव्यक्तीचे खास पापुद्रे व्यक्त केले आहेत त्याचा परामर्श येथे घेतला आहे. भाषाशैलीचा वापर कथा खुलवण्यासाठी जाणीवपूर्वक केल्याचे त्यांच्या कथा वाचताना जाणवते ते मांडण्याचा सादर प्रयत्न केला आहे. डॉ. पठाण यांची भाषा साधी सरळ आणि ओघवती आहे. त्यांच्या कथेत मुस्लिम कथामध्ये दक्खनी भाषेचा प्रभाव आहे. या प्रकरणात शेवटी त्यांच्या कथेतून माणूसकी जपण्याचा मानवी मनाचा शोध घेण्याचा आणि त्यातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. मुस्लिम दलित सदृश माणसाची व्यथा, वेदना, दुःख व्यक्त करणं हा खास पैलू आहे तो 'हवेली'मध्ये साकारला आहे.

**प्रकरण पाचवे :-** पाचव्या प्रकरणात डॉ. यू.म. पठाण यांची लेखनशैली आणि मराठी साहित्यात टाकलेली भर याचा उहापोह याचा परामर्श घेतला आहे. मुस्लिम दलित सदृश जीवनाचं संपूर्ण जाणीवेनिशी चित्रण करण्याचं सामर्थ्य लेखक डॉ. यू.म. पठाण यांना आहे. आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत वेगळाच आविष्कार करण्याचं सामर्थ्य त्यांना लाभले आहे हे त्यांचे वाङ्मय वाचताना निश्चित जाणवते. त्यांची कथा सुरू करण्याची खास लकब आहे जे आजवर मराठी कथेत अभावानेच जाणवते ती संवादमयशैली, नाट्यात्मकता डॉ. पठाण यांनी जाणीवपूर्वक हाताळलेली आहे. त्यांनी अनेक संदर्भाने पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. विषयवैविध्य, स्त्री चित्रण कथाविषयक दुःख इत्यादीतून कथा विषयातून आशय आणि अभिव्यक्तीचे अनोखे दर्शन घडते. तसेच त्यांच्या कथालेखनामध्ये हिंदी, दक्खनी, उर्दू भाषेचा प्रभाव आहे. डॉ. पठाण यांच्या कथांच्याबद्दल एखादा अनुभव त्यांच्या चिंतनाचा दीर्घकाळ विषय होतो आणि यथावकाश तो कथारूपात अवतीर्ण झालेला असतो असे म्हणता येईल. २१ व्या शतकातील मुस्लिम दलित सदृश व्यथा-वेदनांचे चित्रण करणारे चित्रण फार कमी आहे पण डॉ. पठाण यांच्या लेखन शैलीने ते समाजापुढे आणले. १९८८ मध्ये अखिल भारतीय दलित साहित्य अकादमीची डॉ. आंबेडकर फेलोशिप त्यांना मिळाली. तसेच २००१-२००२ दलित मित्र पुरस्कार मानसन्मान त्यांना प्राप्त झाला याचा

समावेश केला आहे. मुस्लिम दलित सदृश्य व्यक्तीचित्रणाच्या माध्यमातून समाज जागृतीसाठी कथांच्या माध्यमातून समाज जागृतीसाठी कथांच्या माध्यमातून त्या पात्राच्या व्यथा-वेदना यांचे चित्रण केले आहे. त्यांच्या कथालेखनाचा प्रारंभ, लेखनातील संवादात्मकता व नाट्यात्मकता मुस्लिम जीवनाचे प्रभावी व परिणामकारक चित्रण विविध व्यक्तीचित्रणाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचा वसा घेवून आपल्या खास लकबीने आणि त्याच्याच खास शैलीने मराठी कथेमध्ये एक अभिनव रूप धारण करते. परंपरेच्या पांगुळगाड्यात न अडकता स्वत:ची नवी वाट शोधण्याचा ध्यास हा डॉ. पठाणांच्या नवनवोन्मेष शालिनी प्रतिभेचा एक नवा आविष्कार निर्माण करण्यात यशस्वी झाली आहे. हे मराठी कथेतील अनन्यसाधारण योगदान म्हणावे लागेल असे मत मांडले जाते.

याप्रमाणे डॉ. यू.म. पठाण यांची ग्रंथसंपदा, त्यांना लाभलेले मान-सन्मान, पुरस्कार, त्यांची विदेशी यात्रा, सदस्यत्व, शब्दसूची ही सर्व परिशिष्टे प्रबंधिकेतील आशयाला परस्पर पूरक आणि श्रेयस्कर आहेत. अखेरीस संदर्भग्रंथाची सूची जोडून प्रबंधिकेच्याद्वारे दलित सदृश्य व्यथा वेदनांचे चित्रण डॉ. यू.म. पठाण यांच्या 'जितराब' व 'हवेली' या कथासंग्रहाच्या आधारे या कथालेखनाचे विशेष पहिल्यांदाच या प्रबंधिकेद्वारे अभ्यासकासमोर येत आहेत ही महत्त्वपूर्ण बाब आहे. मिळालेल्या संदर्भानुसार हा सर्व अभ्यास संशोधनाच्या पध्दतीला मांडलेला आहे. त्यामध्ये काही त्रुटी असण्याची शक्यता असली तरी ती त्रुटी जर काही संदर्भ उपलब्ध झाले नसेल तरच त्रुटी रहाण्याची शक्यता आहे. तरी डॉ. यू.म. पठाण यांच्या कथासंग्रहाचे विशेष या प्रबंधिकेद्वारे मराठी अभ्यासकांसमोर पहिल्यांदा येत आहेत ही या प्रबंधिकेची जमेची बाजू धरल्यास अतिशयोक्ती होऊ नये हे मी मराठी कथेच्या अभ्यासातील एक महत्वाचं अंग म्हणून नोंदविल्यास अप्रस्तुत ठरू नये असे वाटते.

***